MHKO100006412024

## आदेश निशाणी क्र. २०

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ५ चे नाव दाव्यातून कमी करण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ५ श्रीमती अनुसया शिवराम कांबळे या पुर्वीच मयत झाल्या असून त्यांचे वारस दाव्यात समाविष्ट आहेत. सबब प्रतिवादी क्र. ५ चे नाव दाव्यातून कमी करण्यास परवानगी मिळावी.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जास म्हणणे देवून योग्य ते आदेश पारीत करणेबाबत कळवले आहे.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाची पाहणी केला असता प्रतिवादी क्र. ५ अनुसया अनुसया शिवराम कांबळे यांचे नाव दाव्यामध्ये नमूद आहे. निशाणी ६ वरील बेलीफ रिपोर्टवरून असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ५ ही दहा ते बारा वर्षापुर्वी मयत झाली असल्याचे दिसून येते. वादी यांनी श्रीमती अनुसया कांबळे यांचे वारस अभिलेखावर असल्याबाबत शपथेवर कथन केले आहे. तसेच प्रतिवादी यांनी देखील योग्य आदेश पारीत करण्याबाबत कळवले आहे. त्यामुळे वादी कथन करत असल्याप्रमाणे अनुसयाचे वारस दाव्यामध्ये यापुर्वीच समाविष्ट असल्याचे म्हणता

येईल. त्यामुळे श्रीमती अनुसया शिवराम कांबळे यांचे नाव त्या मयत झाल्याने दाव्यातून कमी करणे योग्य होईल. त्यानुसार, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आ दे श**

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) वादी यांनी दाव्यात १४ दिवसांत अर्जाचे अनुषंगाने दुरुस्ती करुन घ्यावी व दाव्याची दुरुस्ती प्रत सत्वर दाखल करावी.

३) या अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ठ करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2024.11.07 12:03:07 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०५/११/२०२४

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज